Estd. 1962
NAAC 'A++' Grade

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प रि प त्र क

२१/२०२१

विषय - कोव्हीड-१९ विषाणूच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनाच्या अनुषंगाने (Break The Chain)

संदर्भ - १. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/सीआर.९२/ डी.एम-१, दिनांक १३ एप्रिल, २०२१.

२. जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर यांचे आदेश जा.क्र.नैआ/कोरोना विषाणू/आरआर/३९७/२०२१ दि.०१/०४/२०२१

३. कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांचे पत्र दि. १२/०४/२०२१

सर्व संबधिताना आदेशान्वये कळविण्यात येते की, कोविड-१९ संसर्गाचा वाढत असलेला प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने उपरोक्त सदंर्भीय क्र. १ नुसार राज्यामध्ये १४४ कलम लागू करण्यात आलेले आहे. तसेच कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी शिवाजी विद्यापीठातील वसतिगृहे कोविड काळजी केंद्रासाठी अधिग्रहित केली आहेत. त्यामुळे विद्यापीठ परिसर तापुरत्या स्वरूपात पुढील आदेश होईपर्यंत प्रतिबंधीत करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने सर्व अभ्यांगतासाठी विद्यापीठ परीसरामध्ये प्रवेश प्रतिबंधित केला आहे. विद्यापीठ प्रवेशव्दार क्रमांक १ व ६ हे फक्त विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, सेवक तसेच विद्यापीठ निवासस्थानांमध्ये वास्तव्यास असणाऱ्या शिक्षक, अधिकारी, सेवक यांचे कुटुंबियांकरिता खुली राहतील. प्रवेशव्दार क्रमांक ८ हे फक्त वसितगृहातील कोवीड सेंटरच्या रूग्ण व अनुषांगिक शासकीय वाहनांकरिता खुले राहिल. संलग्नीत महाविद्यालयातील अतिमहत्वाच्या तसेच, परीक्षेच्या कामकाजाकरीता संबधित शिक्षक, अधिकारी, सेवक यांना विद्यापीठातील संबधित विभागप्रमुखांच्या पूर्व परवानगीने विद्यापीठ प्रवेशव्दार क्रमांक १ व ६ मधून प्रवेश दिला जाईल. तरी संबधित सर्व घटकांनी याबाबत योग्य ते सहकार्य करावे.

(डॉ. विलास द. नांदवडेकर)
कुलसचिव

जा.क्र. आस्थापना/ 1030
दि. 14 APR 2021
प्रति,

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक
२) संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांचे प्राचार्य/संचालक
३) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
४) विभाग प्रमुख - अ) सुरक्षा विभाग ब) जनसंपर्क कार्यालय
५) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.
- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.